रविवार
नवाकाळ
मुंबई, २ एप्रिल, २००६

# रस्त्यावर भरकटणाऱ्या मनोरुग्णांसाठी 'श्रद्धा' एक आशेचा किरण!

मुंबई, शनिवार- मनोरुग्ण! व्यावहारिक जगाच्या पलीकडे, स्वत:च्या भावविश्वात रमणारे, समोर कोणीतरी असल्याचा आभास करत बडबडणे, एकच कृती सारखी सारखी करणे या मोजक्या काही मनोरुग्णांच्या समस्या आहेत. रस्त्यावर नकळत नजरेस येणारे हे मनोरुग्ण हे समाजातील उपेक्षित घटक आहेत. बसस्थानक, रेल्वे स्थानक व रस्ते आदी परिसरात हमखास आढळणारे हे मनोरुग्ण स्वत:च्या तंद्रीत मग्न असतात. या मनोरुग्णांना मदतीचा हात दिला. श्रद्धा पुनर्वसन केंद्राने! भारतातील रस्त्यांवर फिरणाऱ्या मनोरुग्णांसाठी वाहून घेतलेल्या या केंद्राच्या फार्मचा उद्‌घाटन सोहळा गुरुवारी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते पार पडला.

डॉ. भरत वाटवानी व डॉ. स्मिता वाटवानी यांच्या अथक प्रयत्नाने हे श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभे राहिले आहे. मनोविकार तज्ज्ञ असलेल्या वाटवानी दाम्पत्यांनी या रुग्णांसाठी काही तरी करायचा मनात निर्धार केला होता.



मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकापासून २ किमी अंतरावर असणाऱ्या वैजगावात हे पुनर्वसन केंद्र उभे राहिले आहे. १९८८ मध्ये दहिसर येथे दोन मजल्याच्या इमारतीमध्ये सर्वप्रथम श्रद्धा पुनर्वसन केंद्राची सुरुवात झाली. सामाजिक जाणिवेतून सुरुवात झालेल्या केंद्रात अगोदर फक्त ३० रुग्णांची सोय होती. रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांना या केंद्रात आणले जायचे. २ ते ३ महिने औषधोपचार करून त्यांना घरी सोडण्याची व्यवस्था या केंद्रातून विनामूल्य सेवा दिली जायची.

डॉ. वाटवानी दाम्पत्याला अजूनही यापेक्षा मोठे काही तरी करायची इच्छा होती. मित्र परिवार व बँकेच्या सहकार्याने डिसेंबर २००४ मध्ये त्यांनी कर्जत येथील वैजगावात सुमारे साडेसहा एकर जमीन विकत घेतली. मनोरुग्ण स्वबळावर पायावर उभे राहण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या 'आनंदवन'च्या धर्तीवर हे फार्म विकसित करण्याचे डॉ. भरत वाटवानी यांनी ठरविले. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन झाले. बाबांची आज एक इच्छा या केंद्राद्वारे पूर्ण झाली. बाबांनी कुष्ठरोगी व इतर रुग्णांसाठी बरेच कार्य केले पण मनोरुग्ण मात्र तेवढे राहिले होते, असे डॉ. प्रकाश आमटे भाषणात म्हणाले. वर्ध्याला एका कामानिमित्त आलेले डॉ. भरत वाटवानी हे 'आनंदवन'ला बाबा आमटे यांना भेटण्यासाठी गेले. पण बाबा यावेळी हेमलकासा येथे माझ्याकडे होते. हेमलकासा येथील परिसर पाहून प्रभावित झालेले डॉ. वाटवानी यांनी मनोरुग्णांसाठी असाच उपक्रम करण्याचा निर्धार केल्याचे प्रकाश आमटे यांनी पुढे सांगितले.

## कुक्कुटपालन व शेती

कर्जतच्या जमिनीवर मनोरुग्णांना स्वयंरोजगाराचे साधन म्हणून कुक्कुटपालन, शेती व दुग्धव्यवसाय आदींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बहुतेक रुग्ण ग्रामीण भागातील असल्याचे ते हे सहज शिकतील, असे डॉ. वाटवानी म्हणाले. सध्या या केंद्रात २५ पुरुष व १७ स्त्रिया आहेत. यात बहुतेक महाराष्ट्रातील आहे.

## डॉक्टरांची मेहनत

मनोरुग्णांकडून सहजासहजी माहिती काढणे अवघड असल्याचे येथील निवासी डॉक्टरांनी सांगितले. रस्त्यावर भटकत असणाऱ्या या मनोरुग्णांना येथे आणल्यावर येथे त्यांची स्वच्छता होते. जेवायला दिले जाते. पण सुरुवातीला कधी कधी हे मनोरुग्ण रागात येऊन आमच्यावर हल्लाही करतात. पण नंतर हळूहळू प्रेमाने आम्ही त्यांच्याकडून नाव, पत्ता आदी माहिती काढण्यास सुरुवात करतो. पण यात बराच वेळ जातो.

श्रद्धा पुनर्वसन केंद्रांची त्या रुग्णाला घरच्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी असते. पण हा मनोरुग्ण कधीही पूर्ण माहिती सांगत नाही. कधी जिल्हा तर कधी तालुका! अशा वेळी रुग्णाचे घर शोधणे कठीण असल्याची खंत या निवासी डॉक्टरांनी व्यक्त केली. श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या ताफ्यात चेतन पाटील, डॉ. जिन्टो अब्राहम, ध्रुव बढेकर, अनुप के. के. व जोसी असा अनुभवी सहकाऱ्यांचा समावेश आहे.

श्रद्धा पुनर्वसन केंद्र स्थापन झाल्यापासून आजपर्यंत ८०० मनोरुग्णांना त्यांच्या घरी सुखरूप पोहोचविले आहे. समाजात मनोरुग्णांकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे मदतीचा ओघही कमी असल्याचे डॉ. वाटवानी यांनी सांगितले. तुम्हाला कोणा मनोरुग्णाला जर श्रद्धा केंद्रात आणायचे असेल किंवा आर्थिक मदत करायची असेल तर पुढील पत्त्यावर संपर्क साधू शकता.

श्रद्धा पुनर्वसन केंद्र
वैजगाव, कर्जत (पू.)
मोबाईल- ९८५०६८१७८१, ९२२६२२७११४
कार्यालय श्रद्धा मानसरोवर
ऑफ न्यू लिंक रोड,
बोरिवली (प.)-४००१०३
दूरध्वनी- ९८९२५९३४३७
२८९५५०२०/ २८९१५४५१
५५७३९२६९/५६८५२६२८

### 'स्किझोफ्रेनिया'

वैद्यकीय परिभाषेत मनोरुग्णाला 'स्किझोफ्रेनिक पेशंट' संबोधले जाते. ज्या रोगामध्ये विचार, भावना व कृती यामध्ये फारकत पडत जाते असा हा मानसिक रोग अशी स्किझोफ्रेनियाची व्याख्या आहे.